**मराठी विज्ञान परिषद पुणे शाखा** द्वारा **म. ना. गोगटे** 4 पवन अपार्टमेंट, लक्ष्मी पार्क, नवी पेठ, पुणे 411030 ( mngogate1932@yahoo.com) फोन 020-24537574 (8-9 am 2-3pm 9-10 pm)

## वार्षिक वृत्तांत एप्रिल 2006 ते मार्च 2007

मराठी विज्ञान परिषद पुणे शाखा संचालक मंडळाच्या वतीने हा वृत्तांत सादर करित आहे.

**शाखेची वार्षिक साधारण सभा** सदर सभा 18 एप्रिल रोजी इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स, शिवाजीनगर येथे झाली. त्यात 2005-06 शाखा वृत्तांत संमत झाला, व 2006-07 वर्षासाठी पुढील संचालकमंडळ निवडले गेले. डॉ नीलकंठ पटवर्धन, डॉ शांताराम काणे, डॉ गोविंद पानसे, डॉ सुरेश गोरे, डॉ के.सी. मोहिते, (प्रमुख) श्री मधुकर ना. गोगटे. वृत्तांतवर्षात मंडळाच्या दोन सभा झाल्या.

**इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स (पुणे केंद्र)** यांच्या सहकार्याने नागरी समस्या, अभियांत्रिकी यांवर पुढील उद्बोधक जाहीर मराठी भाषणे त्यांच्या सभागृहात (जंगलीमहाराज रस्ता, शिवाजीनगर, पुणे 411005 फोन 25533376) झाली. कार्यक्रम सहसा दरमहा तिसऱ्या मंगळवारी सायं 6-30. (15 ऑगस्टऐवजी वेगळा दिवस) भाषणानंतरच्या इंस्टिट्यूशन न्यूजबुलेटिनमध्ये त्याचा सारांश येतो.

18 एप्रिल श्री आ द. जोशी एलपीजीवर आधारित वाहने.
16 मे श्रीमती प्रतिमा जोशी पुण्यातील झोपडपट्टी.
20 जून श्री म. य. थोते दूरचित्रवाणी व समाज
18 जुलै श्री प्रमोद मांडके अभियांत्रिकीतील कल्पकतापूर्ण सर्जनशीलता
22 ऑगस्ट श्री प्रकाश देशमुख नगररचनाविकास व पुणे महानगर.
19 सप्टें श्री श्रीकांत थत्ते बांबूविकास व प्रसार
17 ऑक्टो श्री रवी दातार मोबाईल फोनची नवनवलाई
21 नोव्हें डॉ बा. ना. दिवेकर फेरोक्रीट.
19 डिसें श्री मो. ना. गोवईकर पंप व ऊर्जाबचत.
16 जाने डॉ श्रीराम गीत नागरिक व शहरी समस्या
20 फेब्रु श्री बी. एच. श्रीकांत कोळसा व बायोकोळसा
20 मार्च डॉ. सुरेश गोरे रसायने व नागरिक

**महाराष्ट्र साहित्य परिषद** यांच्या सहकार्याने त्यांच्या सभागृहात (टिळक रस्ता, सदाशिव पेठ, पुणे 411030) राष्ट्रीय विज्ञानदिन 28 फेब्रु. सायं 6-30 श्री दीपक शिकारपूर यांचे उद्बोधक जाहीर भाषण झाले. विषय --- संगणकक्षेत्राची भरारी. *(पुढील पानावर चालू)*

*पुणेशाखा सभासद नसणाऱ्यांनी वृत्तांत = माहितीपत्र समजावे.* mavipa@vsnl.com *येथे विज्ञानप्रेमी लोकानी ईमेल करावी* subject *मध्ये* send pdf 2000 kb attachment *लिहावे. यथावकाश ईमेलने 32 पानी मासिक मविप पत्रिका नमुना मिळेल. परिषदेस देणगीबाबतीत आयकर 80 जी मान्यता आहे*

**शालेय पातळीवर कार्य (1)**

मूलभूत विज्ञान हे तंत्रज्ञान व विकास यांचा पाया आहे. मूलभूत विज्ञान संशोधनाकडे हुशार विद्यार्थी फिरकत नाहीत हे ठीक नाही. संशोधन म्हणजे काय ? ते कसे करतात? कोठे वाव आहे ? संशोधकास आनंद, मान, पैसा मिळतात अशा माहितीसाठी (मूलभूत संशोधनाकडे वळा) यावर तरूण संशोधक श्री पारिजात कानिटकर यांची 6 भाषणे ज्ञानप्रबोधिनी (510 सदाशिव पेठ, पुणे 411030) यांच्या सहकार्याने पुढील शाळांत (त्यांच्या सोयीने नववी ते बारावी मधील) विद्यार्थ्यांसाठी झाली. 11 डिसें राजा रघुनाथराव कनिष्ठ महाविद्यालय (भोर), 12 डिसें न्यू इंग्लिश स्कूल (सासवड), 12 डिसें वाघिरे महाविद्यालय (सासवड), 13 डिसें अनंतराव थोपटे महाविद्यालय (भोर) 14 डिसें अमृतेश्वर विद्यालय (विंझर) 15 डिसें ज्ञानप्रबोधिनी (पुणे, व प्रक्षेपणाने नवनगर विद्यालय, निगडी)

**शालेय पातळीवर कार्य (2)**

इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स (पुणे केंद्र) च्या सहकार्याने पुण्यातील पुढील मराठी शाळांमध्ये (त्यांच्या सोयीने नववी ते अकरावी /सायन्सक्लब मधील) विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकीवर भाषणे झाली.

विजेची उपकरणे -- श्री अनिल केळकर (अहिल्यादेवी हायस्कूल, शनिवार पेठ 30 नोव्हें)

नदीवरील धरणे -- श्री विद्यानंद रानडे (न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता 28 फेब्रु)

जल पर्यावरण -- डॉ अशोक पटवर्धन (रावसाहेब पटवर्धन विद्यालय, पर्वती 6 जाने) (नूतन मराठी विद्यालय, बाजीराव रस्ता 28 नोव्हें )

बांबू व पर्यावरण -- श्री श्रीकांत थत्ते (भावे हायस्कूल, सदाशिव पेठ 19 सप्टें )

आरसीसी म्हणजे काय ?- श्री म. ना गोगटे, डॉ नी. र. पटवर्धन (भावे हायस्कूल 14 सप्टें)

आरसीसी म्हणजे काय ? - श्री म. ना. गोगटे (अशोक विद्यालय, टिळक रस्ता 26 फेब्रु) (वसंतराव वैद्य शाळा, राजेंद्रनगर 10 फेब्रु)(मॉडर्न मुलांचे हायस्कूल, शिवाजीनगर 18 नोव्हें) (आगरकर मुलींची शाळा, सोमवार पेठ 27 नोव्हें). *(2007-08 मध्ये हे कार्य वाढवायचे आहे त्यासाठी पुण्यातील विविध शाळा, विविध विषयांचे तज्ञ यानी इंस्टिट्यूशनशी संपर्क करावा).*

**संकीर्ण**

शाखेच्या खर्चासाठी मराठी विज्ञान परिषद प्रधान कार्यालय (विज्ञान भवन, पुरव मार्ग, मुंबई 400022 फोन 25224714 मंगळवारी रजा, ईमेल mavipa@vsnl.com) यानी आवश्यक निधी दिला. प्रधान कार्यालय, सहकारी संस्था, शाळा, व्याख्याते, सभासद, प्रसारमाध्यमे, हितचिंतक यांस धन्यवाद

-- **म. ना. गोगटे** (प्रमुख संचालक) पुणे 1 एप्रिल 2007

**सूचना म.वि.प पुणे शाखेची वार्षिक साधारण सभा** (सभासदांसाठी) मंगळवार 17 एप्रिल 2007 सायं 5-30 ते 6-00 इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स, पुणे येथे भरेल. सभासदानी यावे ही विनंती. वरील वृत्तांत संमत करणे, 2007-08 साठी संचालक मंडळ निवडणे इत्यादी कामे होतील.

**इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स,** जंगलीमहाराज रस्ता, शिवाजीनगर पुणे यांच्या सहकार्याने त्यांच्या जागेत **17 एप्रिल 2007 जाहीर 2 कार्यक्रम** सायं 6-00 ते 6-30 पर्यायी रोमन लिपी वक्ते - म. ना. गोगटे (चर्चेसाठी सोबत टिप्पण) 6-30 ते 7-45 सुनामी व अंदमान. वक्ते प्रा. अनिल दांडेकर.

# **रसायने व नागरिक** - डॉ सुरेश गोरे (शब्दांकन म. ना. गोगटे )

सामान्यपणे नागरिकांना रसायनांविषयी एक प्रकारची भीती वाटत असते, तिटकारा असतो. पण हा गैरसमज आहे. मानवी समाजाची आतापावेतो जी प्रगती झाली, त्यात रसायनांचे उपयुक्त योगदान आहे. उदाहरणार्थ, स्वच्छतेसाठी आपण साबण वापरतो, आरोग्य बिघडले की काही औषधे घेतो, फर्निचर सुंदर दिसावे व टिकावे म्हणून त्यावर पॉलिश मारतो, अंगावर नायलॉनसारख्या तंतुंचे कपडे वापरतो, वाहतुकीसाठी पेट्रोलसारखी इंधने वापरतो. हे सर्व पदार्थ म्हणजे विशिष्ट रसायने आहेत. काही रसायने नैसर्गिक आढळतात, काही कृत्रिमपणे निर्माण तयार झाली आहेत. आपण दररोज पाणी वापरतो, तेही एक नैसर्गिक रसायन आहे. या सर्व दैनंदिन गोष्टी झाल्या. युद्धासारख्या कार्यासाठी दारुगोळा लागतो त्यातही रसायने असतात. साधारणपणे कोणतेही रसायन एका विशिष्ट मात्रेत असले तर उपयुक्त असते, अतिरेक झाल्यास ते घातक होऊ शकते. त्याबाबतीत प्रत्येकाने दक्षता घ्यायला हवी. दिवाळीची प्रचंड फटाकेबाजी पहा. प्रचंड धूर, दणदणीत आवाज, आगी अशा आपत्ती येतात. तसेच होळीतली रंगबाजी पहा. दुसऱ्यास इजा होईल इतका रंग फेकतात, कपडे व रस्ते बिघडतात. यात रसायनांपेक्षा आपले बेपर्वा वर्तन, सभ्यतेचा व तारतम्याचा अभाव वाईट आहेत

रासायनिक भेसळ हाही एक चर्चेचा व चिंतेचा विषय असतो. गाजरे, डाळी, इत्यादी मालाला आकर्षक रंग दिले जातात, पण ते विषारी असतात. व्यापारी किंवा उत्पादक यांची येथे स्वार्थी बेपर्वाईच असते. लक्षात ठेवावे की शासनाने मंजूर केलेल्या प्रमाणात रंग लावता येतात. काही भेसळ इष्ट असते. उदा. घरगुती प्रोपेन गॅसची गळती झाली तर अचानक आग लागू शकते व श्वसनास अपाय होतो. गळती लक्षात यावी म्हणून मेरकॅप्टन नावाचे रसायन सूक्ष्मपणे गॅसमध्ये मिसळतात, त्या रसायनाचा घाणेरडा वास आपणास सावध करतो. भेसळ कशी ओळखावी याचे लोकशिक्षण व्हावे. मंडपाला आग लागल्यास माणसे मरतात. आगप्रतिबंधक रसायने लावलेलेच कापड वापरीन, अशी व्यावसायिक अभिमानवृत्ती वाढली पाहिजे. आगामी कालात नॅनोटेक्नॉलॉजी, डीएनए मॅपिंग, सोलर एनर्जी अशा तंत्रज्ञानांवर आधारलेली अभूतपूर्व रसायने नागरिकांच्या वापरात येणे अपेक्षित आहे.

---------------------------

**नियतकालिकांस विनंती (1)** असे छोटे लेख वेळोवेळी आपणांस प्रसिद्धीसाठी हवे असल्यास म. ना. गोगटे (पत्ता पुढील पान) यांस कळवावे. इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स आणि मराठी विज्ञान परिषद यांतर्फे पुणे येथे 20 मार्च 2007 रोजीच्या व्याख्यानाचा सारांश वर दिला आहे. तसे उल्लेख, वक्ते - परिचयकर्ते - आभारकर्ते असेही निर्देश इंस्टिट्यूशनच्या वार्तापत्रात येतात. **नियतकालिकांस विनंती (2)** वरील दोन्ही संस्थांनी पर्यायी रोमन लिपी स्वीकारली नाही पण चर्चेस संमती असते. (तो क्लोरिन वायू आहे) = ( to Chlorine vaayu aahe) किंवा (to klorin vaayu aahe) लिहिता येईल. समाजमन तयार व्हावे म्हणून अधूनमधून दोन लिप्यात नमुने देण्यास तयार असणाऱ्या नियतकालिकानी कळवावे. (उदा.) वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे vrukshavalli aamhaa soyari vanachare पक्षीही सुस्वरे आळविती pakshihi susvare aal'aviti (कविता अंश, चुटके वगैरे) *पुढील पान पहा.*

---

**लेखकाचा परिचय** जन्म 10 सप्टेंबर 1932 मुंबई. शिक्षण इंटर सायन्स (मुंबई विद्यापीठ 1950) बीई सिव्हील (पुणे विद्यापीठ 1953) एमएस्सी (लंडन विद्यापीठ 1956) स्ट्रक्चरल अभियंता. मुंबईहून पुणे स्थलांतर 1997. मराठी विज्ञान परिषद एक संस्थापक (1966), एक पूर्वाध्यक्ष (1976-82) वेबसाईट www.mngogate.com

**पर्यायी रोमन लिपी** (एक टिप्पण) --- **म. ना. गोगटे** 4 पवन अपार्टमेंट, लक्ष्मी पार्क, नवी पेठ, पुणे 411030 (mngogate1932@yahoo.com) फोन 020-24537574 ( 8-9 am, 2-3 pm 9-10 pm )
(17 एप्रिल 2007 सायं 6 इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स पुणे येथे चर्चेसाठी) किंवा (अन्यत्र विचारार्थ)

*लेखनकाल 20 मार्च 2007. अभिप्रायार्थ, प्रसारार्थ*

देवनागरी लिपी हवी. तिची ध्वनीव्यवस्था चांगली व लेखन संक्षिप्त (प्रेम 2 अक्षरे)(prem 4 अक्षरे). पण ती बहुस्तरी आहे, चिन्हांची गुंतागुंत आहे उदा (राम, सूर्य, ट्रक, प्रेम, ऱ्हास) पाच रकार आहेत. देवनागरीत मुद्रण व संदेशवहन जमत नसल्यास ध्वनीनिष्ठ केलेली रोमन लिपी वापरावी. इंटरनेटवर माहितीचा खजिना शोधण्यास एकस्तरी रोमन लिपी सोयीची. आज शेअरबाजार यादी, थिएटर रांगा, नावपत्ते डायरी यात A-Z हेच सूत्र असते. देवनागरीत (च ज झ) यांचे दुहेरी ध्वनी आहेत. (दार् ) या ध्वनीचे लेखन (दार) होते. रोमनमध्येही बारीक उणीवा चालतील. लिपी म्हणजे टेपरेकॉर्डर नव्हे.

*पर्यायी रोमन लिपी स्वीकारल्यास इंग्रजीचे कित्येक शोध मराठीस ताबडतोब उपयोगी.*

.

रोमन मराठीत ऱ्हस्वदीर्घ भेद नकोत. हिंदी = hindee ऐवजी hindi असेच लिहितात (तेरा तेल) मध्ये एकार उच्चारात ऱ्हस्व व दीर्घ पण लेखनात समरूप आहे. Police, Family असे शेकडो शब्द मराठीत लिहिताना (पोलिस? पोलीस?) नियम नाहीतच. din = दिन दीन संदर्भाने अर्थ घ्यावा, जसा (कर) हा अनेकार्थी शब्द. घरोघरी इंग्रजी कीबोर्ड जात असून ग्रामीण प्राथमिक शाळेतही a-z इंग्रजी शिकवतात

## <u>पर्यायी रोमन लिपी</u> (चिन्ह - ध्वनी संकेत)

**अ** = a **आ** = aa **इ** = i **उ** = u **ए** = e **ओ** = o **ॲ** = ae **ऑ** = ao **अस्पष्ट अनुस्वार** = m' (हंस ham's) **क्** = k **ख्** = kh **ग्** = g **घ्** = gh **च्** (चक्र) = ch **च्** (काच) = ch' **छ्** = chh **ज्** (जीव) = j **ज्** (जवळ) = j' **झ्** (झकास) = jh **झ्** (झरा) = z **ट्** = t' **ठ्** = t'h **ड्** = d' **ढ्** = d'h **ण्** = n' **त्** = t **थ्** = th **द्** = d **ध्** = dh **न्** = n **प्** = p **फ्** = ph **ब्** = b **भ्** = bh **म्** = m **य्** = y **र्** = r **ल्** = l **व्** = v **श्** = sh **स्** = s **ह्** = h **ळ्** = l' **ऐ औ क्ष ज्ञ** = ai au ksha dnya

*आपण मराठी बोलतो, जरूर तेव्हा इंग्रजी. तसेच देवनागरी वापरावी, जरूर तेव्हा रोमन.*

**<u>उदाहरणे</u>** अती तेथे माती. दुरून डोंगर साजरे. गरज सरो व वैद्य मरो. ati tethe maati... durun d'ongar saaj'are... garaj' saro va vaidya maro. ( इंग्रजी शब्दयुक्त वाक्य) ती कंपनी ब्राऊन पेपर बनवते = ti kampani braaun pepar banavte. (अथवा) ti Company Brown Paper banavte.

*आपला ईमेलपत्ता कळवा, सरावासाठी रोमन मराठी नमुने वेळोवेळी ईमेलने मिळतील.*

www.mngogate.com लेख M12 पहा. सर्व चिन्हे इंग्रजी मुद्रण व संदेश यंत्रात उपलब्ध. (च ज झ) यांचे दुहेरी ध्वनी आहेत. अपोस्ट्रोफी ’ चिन्हास अपो म्हणावे. (त् = t )( ट् = t' ) घ्यावे. (ट् = t खाली टिंब) अशी नवी चिन्हे नकोत. ( ट् = T ) असेही नको. नावे व मूळ इंग्रजी शब्द लिहिताना आद्याक्षर कॅपिटल (table = तबले)(Table t'ebal = टेबल)(taaraa Tara = तारा). वाक्यारंभी कॅपिटल नसल्याने वाक्यांदरम्यान तीन (...) पूर्णविराम. सुटे वाक्य/परिच्छेद यांअखेर एक पूर्णविराम. (ज्याने मध्ये उच्च सरकार सत्य दुःख ऋषि) = ध्वनीनुसार jaane, madhe, utcha, sarkaar, sattya, dukkha, rushi. = जाने, मधे, उत्च, सर्कार्, सत्त्य, दुक्ख, रुशि. ध्वनिनिष्ठेचा अतिरेक नको. लेखनसोयही पहावी.